# उच्चभ्रूंचे मतदान कमी

## गोखले संस्थेच्या पाहणीतील निष्कर्ष; पेठांमध्ये प्रमाण अधिक

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

विमाननगर, बालेवाडी, कोथरूड, एनआयबीएम या चार भागांतील उच्चभ्रू आणि उच्चशिक्षित नागरिकांचा मतदान करण्याचा कल मध्य पेठा किंवा हडपसर परिसरातील मध्यमवर्गीय नागरिकांपेक्षा कमी आहे. एवढेच काय तर उच्चभ्रू भागांतील बहुतांश नागरिकांनी गेल्या दोन महापालिका निवडणुकांमध्ये जेमतेम एकदाच मतदान केलेले असून, त्याउलट मध्य पेठा आणि हडपसरच्या नागरिकांनी मतदान करण्यात पुढाकार घेतला आहे. त्यामुळे, उच्चभ्रू-उच्चशिक्षितांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदानाविषयी उदासीनता असल्याचे आढळून येते.

मतदानाची टक्केवारी

| शिक्षण | मतदान न करणारे | एकदा मतदान | दोनदा मतदान | एकूण |
|---|---|---|---|---|
| अशिक्षित | ३२.८ | ३२.८ | ३४.४ | १०० |
| चौथीपर्यंत | १९.४ | ४८.४ | ३२.३ | १०० |
| पाचवी ते दहावी | २० | ४५.५ | ३४.५ | १०० |
| दहावी ते बारावी | २८ | ४७ | २५ | १०० |
| डिप्लोमा | २३.५ | ५२.९ | २३.५ | १०० |
| पदवीधर ते पदव्युत्तर | ४२.३ | ३९.९ | १७.९ | १०० |
| पदव्युत्तर व नोकरदार | ५२.६ | ३०.८ | १६.७ | १०० |
| एकूण | ३३.३ | ४२.३ | २४.४ | १०० |



गोखले अर्थशास्त्र संस्थेने केलेल्या पाहणीतून हे निष्कर्ष समोर आले आहेत. 'नागरिक मतदान का करीत नाहीत,' या विषयावर पाहणी करण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाने गोखले अर्थशास्त्र संस्थेवर सोपवली आहे. त्यानुसार संस्थेने, पुण्यातील एनआयबीएम, विमाननगर, बालेवाडी आणि कोथरूड हे कमी मतदान होणारे, तर हडपसर आणि मध्य पेठा हे अधिक मतदान होणारे भाग पाहणीसाठी निवडले होते. त्यात प्रत्येकी तीनशे अशा एकूण अठराशे विविध वयोगटांतील नागरिकांशी संवाद साधला. या सर्वेक्षमाची माहिती संस्थेचे प्रभारी संचालक प्रा. राजस परचुरे, प्रा. मानसी फडके, प्रा. अंजली शितोळे, 'यशदा'चे प्रा. ज्ञानदेव तळुपे आदींनी पत्रकार परिषदेत दिली.

विमाननगर, बालेवाडी, कोथरुड, एनआयबीएम या चार वॉर्डातील उच्चभ्रू आणि उच्चशिक्षित नागरिकांचा मतदान करण्याकडे कल हा अतिशय कमी आहे. या वॉर्डातील बहुतांश नागरिक हे गेल्या काही वर्षांत तेथे राहायला आले आहेत. त्यामुळे त्यांना स्थानिक निवडणुकांमध्ये मतदान करण्यासाठी कोणत्याच प्रकारची आवड नाही. यातील बहुतांश नागरिकांनी गेल्या दोन महापालिकेच्या निवडणुकांमध्ये मतदानच केले नाही. त्यानंतर काहींनी केवळ एका वेळेला मतदान केले आहे. याउलट मतदान करण्यात सातत्य राखणाऱ्यांची संख्या अतिशय कमी आहे. याउलट अलका टॉकीज व हडपसर वॉर्डात गेल्या दोन महापालिका निवडणुकीत मतदान करणाऱ्या नागरिकांची सख्या अधिक आहे. मतदान अजिबात न केलेल्यांची संख्यादेखील कमी आहे, असे प्रा. मानसी फडके यांनी सांगितले.

पुणेकरांमध्ये सातत्याने मतदान करणाऱ्या पुरुषांची टक्केवारी ही महिलांपेक्षा अधिक आहे. पुरुषांची टक्केवारी ही ३६.१ टक्के तर महिलांची टक्केवारी २४.३ टक्के आहे. त्यामुळे महिलांनी मतदानासाठी पुढे येण्याची आवश्यकता असून त्यासाठी जनजागृती अभियान राबविण्याची आवश्यकता आहे. तसेच, ज्या नागरिकांना मुले आहेत ते निवडणुकीमध्ये मतदान करण्यात सातत्य राखतात, असे प्रा. फडके यांनी सांगितले.